भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ५२३/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २२/०७/२०१७

**१) मुलीवर विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २०/०७/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील फिर्यादी ही ग्रा. पं. कार्यालय उमरी/फुलमोगरा येथे शासकीय काम करीत असतांना आरोपी हा ग्रा. पं. कार्यालयात येवुन गोंधळ करीत असता फिर्यादीने ईथे गोंधळ करु नको असे बोलली असता यातील आरोपीने फिर्यादीची ओढणी ओढुन मारहान केली व स्त्री जातीला व्हीवस्त्र करण्याचे उद्येशाने तिचेवर हमला केल्याने फिर्यादींचे लेखी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम ३५४(ब),३२३,१८६ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. आडे पो.स्टे. जवाहरनगर हे करीत आहेत.

**२) झाडाच्या फांदया कापण्याच्या कारणावरुन भांडण करुन महिलेचे डोक्याचे केस पकडुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २१/०७/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील फिर्यादी सौ. किशोरी नरेश राहांगडाले वय ३२ वर्ष, रा. सेंदुरवाफा ही आपले मुलासोबत घरी हजर असतांना यातील आरोपीने आपले घरा समोरील कचरा साफ करुन फिर्यादीचे घरा समोर असलेला बकानचा झाड हा ईलेक्ट्रीक पोल जवळ असलेल्या त्या झाडाच्या फांदया कापत असल्याने फिर्यादीने हटकले असता तोंडा तोंडी भांडण करुन आरोपीने लोखंडी विळा घेवुन मारण्यास धावली असता फिर्यादीचा मुलगा हा विट पकडण्यास गेला असता आरोपीने फिर्यादीच्या मुलाच्या हाताचे बोटावर विळा मारुन जखमी केले व फिर्यादीचे डोक्याचे केस पकडुन ओढतांन करुन जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे तोंडी व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३२४,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. सिंधीमेश्राम पो. स्टे. साकोली हे करीत आहेत.

**३) शासकीय कामात अडथळा निर्माण करुन बासाचे काठीने कपाडावर,पायावर,ओठावर मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक २१/०४/२०१२ चे १५.०० वा. दर. हा लोकसेवक असुन फिर्यादी हा आरोपीचे घरी ग्रा. पं. चे टॅक्स वसुल करण्यास गेला असता आरोपीने फिर्यादीस तु माझे घरी येवुन टॅक्स मागणारा कोण होतस असे बोलुन फिर्यादीस त्याचे सार्वजनिक कार्यभार पाडीत असतांना अटकाव करुन धाकाने परावृत्त करुन ईच्छा पुर्वक दुखापत करण्याचे उद्येशाने बासाचे काठीने फिर्यादीचे उजवे कपाडावर, पायावर, ओठावर मारुन जखमी केले व मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादी बयान व डॉक्टरी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३५३,३३३,१८६,५०४,५०६ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. चौधरी पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**४) नदीचे पुराचे पाण्यात तोल जावुन तरुणाचा मृत्यु . :—**

दिनांक १९/०७/२०१७ चे १४.०० वा. दर. यातील मृतक अमित उर्फ करण सोपान भुरे वय १८ वर्ष, रा. चिचोली हा कन्हान नदीत लाकडे काढण्याकरीता नदीचे पुराचे पाण्यात नाव्हेने(डोंगा) गेला असता लाकडे कापीत असतांना नाव्हेतुन नदीचे पुराचे पाण्यात तोल जावुन पाण्यात बुडुन मरण पावल्याने आज रोजी मृतकचे प्रेत मिळुन आल्याने फिर्यादी सोपान लाकडु भुरे वय ४५ वर्ष, रा. कवडसी यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन जवाहरनगर येथे कलम १७४ जाफौ. प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. ताराम पोलीस स्टेशन जवाहरनगर हे करीत आहेत.

**५) शेतामध्ये मृत अवस्थेत इसमाचे उबडया स्थितीत प्रेत मिळुन आले . :—**

दिनांक २०/०७/२०१७ चे ०९.०० वा. ते २१/०७/२०१७ चे ०८.०० दर. यातील मृतक दामोधर नानाजी विधाते वय ३९ वर्ष, रा. पवनी /बु. हा शेतावर रोवण्यासाठी बांधीत पाणी आहे किंवा नाही म्हणुन शेतावर गेला असता तो घरी परत आला नाही त्याला दारु पिण्याचा छंद आहे म्हणुन तो दारु पिवुन कुठे असावा याबात माहिती काढली असता तो मिळुण आला नाही मृतकची पत्नी सौ. लता दामोधर विधाते ही सकाळी ०८.०० वा. शेतावर गवत कापण्याकरीता गेली असता तिला पती मृतक हा शेतामध्ये उबडया स्थितीत मृत अवस्थेत पडलेला दिसुन आल्याने फिर्यादी नानाजी नत्थु विधाते वय ६९ वर्ष, रा. पवना यांचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन पवनी येथे कलम १७४ प्रमाणे मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. डहाके पोलीस स्टेशन पवनी हे करीत आहेत.

**६) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

**अ)** दिनांक २१/०७/२०१७ चे १२.३० वा. दरम्यान यातील मारोती सुझुकी कार चालकाने आपल्या ताब्यातील गाडी क्र. एमएच ३१/३३८६ ही आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. भंडारा येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिन्हेंपुजे पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत

**ब)** दिनांक २१/०७/२०१७ चे १२.५० वा. दरम्यान यातील आरोपीने आपले ताब्यातील ट्रक क्र. एमएच ०४/सी.ऐ ३१३३ हा रोडच्या मध्यभागी उभा करुन येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. भंडारा येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काटेखाये पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत

**क)** दिनांक २१/०७/२०१७ चे १२.५० वा. दरम्यान यातील आरोपी ओमनी कार क्र. एमएच ३० पी ४९८१ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. भंडारा येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. फटींग पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत

**७) वाहन सार्वजनीक ठिकाणी आमरोडवर थांबवुन येणाऱ्या जाणाऱ्या लोकांच्या जिवीतास धोका निर्माण केल्याने गुन्हा नोंद . :—**

**अ)** दिनांक २१/०७/२०१७ चे १७.३० वा. दरम्यान यातील ट्रॅव्हल्स क्र. एमएच जे ०९०५ च्या चालकाने आपल्या ताब्यातील वाहन आमरोडवर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत उभी करतांनी मिळुन आल्याने पोस्टे. पवनी येथे कलम २८३ भांदवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत

८) अवैध दारु/जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक २१/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे आंधळगांव, भंडारा, कारधा व पवनी येथे अवैध दारु/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ५० गुन्हे दाखल किंमती ५०००/–रु. तसेच जुगारातुन किंमती ७३९२/–रु. असा एकुण किंमती १२,३९२/–रु. चा माल जप्त करण्यात आला आहे.

९) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक २१/०७/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२० प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून तीन सिटर वाहनांवरती १६ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०४ केसेस करण्यात आलेल्या आहेत

(एम.एम. सिडाम)
पोनी. जिवीशा भंडारा
करीता
दुरध्वनी.क्र.८८०५६५७२६२

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.